# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे/ईमेलद्वारे**

क्रमांक : प्रनिप्रा/प्र.क्र. ३४९/प्रवेश-२०२४/प्र.शु./प्रवेश-मान्यता/ 6159 दिनांक : 17 OCT 2024

<u>परिपत्रक</u>

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर
अभ्यासक्रमांची महाविद्यालये.
महाराष्ट्र राज्य.

विषय: **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा करण्याबाबत.**

संदर्भ: १) मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(च) मधील निर्णय.

२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदी.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ कलम १६ (३) मधील तरतूदीन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक ४(च) मध्ये निश्चित केल्या प्रमाणेच प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" आकारणी करण्याचे ठरविण्यात आलेले आहे (सुलभ संदर्भाकरिता प्रत संलग्न), त्यानुसार "प्रक्रिया शुल्क" भरणा विहित कालावधीमध्ये (व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश बंद दिनांकानंतर) फक्त प्राधिकरणाच्या पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने सर्व संबंधितांनी अदा करणे बंधनकार क राहिल. याबाबतचा तपशील आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

तसेच अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार सर्व संबंधितांनी (१) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्याची पावती व त्यासोबत (२) संबंधीत संचालकांचा प्रवेश तपासणी अहवाल आणि (३) संबंधित संचालकांनी तपासणी करुन प्रमाणित केलेली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी उक्त नमूद अधिनियमातील कलम ९(५)(दोन) अन्वये प्रवेश बंद दिनांकानंतर विहित मूदतीमध्ये प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करणे बंधनकारक आहे.

उपरोक्त प्रमाणे अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार कार्यवाही न झाल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान होणार नाही अथवा / आणि संबंधितांवर कलम २० नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी गांर्भीयाने नोंद घ्यावी.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
सदस्य सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.

सोबत - वरीलप्रमाणे
प्राधिकरणाच्या दिनांक ०७/१०/२०२४ रोजीच्या निर्णयाची प्रत.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित,-

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
५) संचालक, कृषी शिक्षण संचालनालय, पुणे.
६) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत माहितीकरीता अग्रेषित,-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत, -

१) सर्व संबंधीत परिक्षा समन्यमक / सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक.
३) मा. सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
४) निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.) (अतिरिक्त कार्यभार), प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त.-

विषय क्रमांक ३: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६(३) मधील तरतूदीन्वये प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ मधील प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अनुक्रमे दिनांक २५/११/२०२२ (निर्णय बाब क्रमांक ४(क) व ३१/०८/२०२३ (निर्णय बाब क्रमांक ४(च)) रोजीच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे "प्रक्रिया शुल्क" निश्चितीबाबत निर्णय घेण्यात आला आहे,-

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कोटयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. १००/- परंतू रु. २०,०००/- पेक्षा कमी नसावे.

ब) अनिवासी भारतीय कोटा (NRI) विद्यार्थी प्रवेशाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३०००/-

क) व्यवस्थापन कोटा (Management Quota) / संस्थास्तरीय कोटयातील (Institutional Quota) विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. २०००/-

उक्त निर्णयानुसार खालील प्रमाणे सुत्र प्राधिकरणाच्या निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे,-

| CAP Quota (Total Seats) | Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc. | Total (1+2) | Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/- | No. Institutionl / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/- | No. of Actual NRI admissions x Rs. 3000/- | Total Processing Fees (Column No. 4+5+6=7) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

उक्त बाबी विचारात घेता मागील शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील "प्रक्रिया शुल्क" आकारणीबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी. तसेच संबंधित महाविद्यालयांना संबंधित संचालकांमार्फत कळविण्यात यावे.

*******

Admissions Regulating Authority, Mumbai ★ Maharashtra State ★

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ७२व्या बैठकीचे इतिवृत्त.-

विषय क्रमांक ४: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(च) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चित करण्याबाबत

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६(३) मधील तरतूदीन्वये प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(क) अन्वये खालील प्रमाणे "प्रक्रिया शुल्क" निश्चितीबाबत निर्णय घेण्यात आला आहे,-

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कोटयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. १००/- परंतू रु. २०,०००/- पेक्षा कमी नसावे.

ब) अनिवासी भारतीय कोटा (NRI) विद्यार्थी प्रवेशाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३०००/-

क) व्यवस्थापन कोटा (Management Quota) / संस्थास्तरीय कोटयातील (Institutional Quota) विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. २०००/-

तसेच उक्त निर्णयानुसार खालील प्रमाणे सुत्र प्राधिकरणाच्या निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे,-

| **CAP Quota (Total Seats)** | **Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc.** | **Total (1+2)** | **Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/-** | **No. Institutionl / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/-** | **No. of Actual NRI admissions x Rs. 3000/-** | **Total Processing Fees (Column No. 4+5+6=7)** |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | | | | | |

उक्त बाबी विचारात घेता मागील शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०२२-२३ प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चिती करण्यात येत आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील "प्रक्रिया शुल्क" आकारणीबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी.

Admissions Regulating Authority, Mumbai * Maharashtra State *

*******